नियमित दिवाणी दावा क्रमांक ९४/२०२०

नि.क्रं.३३/सी

**वादींतर्फे साक्षीदार क्रं.४ शपथेवर कथन करतो की-**

माझे नाव - महादेव सुब्राव मोहिते,

वय - ६२ वर्षे,

व्यवसाय - बाँड रायटर,

राहणार - गुडाळवाडी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर.

**सरतपास वादीतर्फे विधिज्ञ वकिल श्री.ए. जे. चौगले यांचे मार्फत -**

**१.** मी शासकीय बॉड रायटर म्हणून काम करतो. माझे ऑफिस सन १९९२ पासून राधानगरी तहसिलदार यांचे आवारात आहे. मी विविध दस्त लिहितो.

**२.** आता मला नि.१७ वरील संचकारपत्र दाखविण्यात आले. ते नोंदणीकृत संचकारपत्र आहे. त्याचा र.द.नं.१९२१/२०१८ असा पडला आहे. सदरील संचकारपत्र दि.१५/१२/२०१८ चे आहे. मला वादी व प्रतिवादी ओळखीचे आहेत. वादी व प्रतिवादी नि.१७ वरील संचकारपत्र करणेकरीता माझ्या ऑफिसला आले होते. वादी व प्रतिवादी हे तुरंबे गावचे आहेत. सदरील संचकारपत्रातील मिळकतीचे बाजारभावाने मुल्य रक्कम रु.१,५०,०००/- असे ठरले होते. सदर संचकारपत्र करतेवेळी वादीने प्रतिवादी यांना रक्कम रु.१,४५,०००/- दिले होते. उर्वरीत रक्कम रु.५,०००/- ही वादीने तहसिलदार यांची परवानगी आणले नंतर देण्याचे ठरले होते. संचकारपत्र (नि.१७) वरील दस्तुर म्हणून सही माझीच आहे. लिहून घेणार म्हणून वादीची सही व अंगठा आहे तसेच लिहून देणार म्हणून प्रतिवादी यांची सही व अंगठा आहे. सदरील संचकारपत्र करतेवेळी २ साक्षीदार वादी व प्रतिवादी यांनी उपस्थित ठेवले होते.

**३.** संचकारपत्र (नि.१७) करतेवेळी वादी प्रतिवादी यांनी दोन ओळखदार आणले होते. मी संचकारपत्र (नि.१७) तयार करून वादी व प्रतिवादी यांना दिला.

**सरतपास पुर्ण.**

**वारंवार पुकारा करून देखील प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर असल्याने उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात येतो.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

sd/-

(एन. पी. काकडे)

दिनांकः १३/०६/२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर

राधानगरी.